**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड - 422101**
**दुरध्वनी क्र. : 0253-2461439** **ईमेल : dycomplan.nashik@maharashtra.gov.in**
**विभागाचे नाव: नियोजन शाखा** **संकलन: कुंभमेळा**

जा.क्र./नि 46 दि- 25/03/2025

प्रति,

मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक.

विषय:- दिनांक 18 मार्च 2025 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन दिनांक 18 मार्च 2025 रोजी मा. अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन 2027 अंतर्गत मा. जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त पुढील कार्यवाहीस्तव या सोबत पाठविण्यात येत असून सदरच्या इतिवृत्तात दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने मुद्देनिहाय अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा ही विनंती.

आपला विश्वासू

(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन)
नाशिक विभाग, नाशिक.

## जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिकच्या बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक- 18 मार्च 2025, वेळ दुपारी 04:00 वाजता.
स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.
बैठकीचे अध्यक्ष- डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक.

बैठकीच्या सुरुवातीला श्री. जलज शर्मा, सदस्य सचिव, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा जिल्हाधिकारी, नाशिक यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांनी बैठकीच्या विषयांची पार्श्वभूमी विषद केली. सदर बैठकी दरम्यान विविध मुद्यांवर चर्चा झाली. त्यातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| **अ** | **सर्वसाधारण सूचना** | |
| 1 | सर्व विभागांनी त्यांचे खर्चाचे नियोजन करीत असताना केंद्र शासनाच्या योजनांमध्ये कामे घेण्यासाठी प्राधान्य द्यावे. त्याठिकाणी शक्य नसल्यास नंतरच राज्य शासनाकडे तसा प्रस्ताव करावा आणि हे दोन्ही पर्याय शक्य न झाल्यास नंतरच जिल्हा स्तरावरील निधीचा विनियोग करावा. त्याचप्रमाणे रेनकोट, कॅप किंवा इतर बाबींसाठी सीएसआर निधीचा वापर करता येईल काय याचा विचार करावा. | सर्व विभाग |
| **ब** | **सी.सी.टी.व्ही आणि पब्लिक ॲड्रेस सिस्टीम** | |
| 1 | सी.सी.टी.व्ही चा आराखडा लवकरात लवकर अंतिम करावा. त्यात साधुग्राम, भाविग्राम अशा प्रकारच्या जागा, घाट, वाहनतळे, रेल्वे स्टेशन, बस स्थानके आणि इतर वर्दळीच्या जागा असाव्यात. सीसीटीव्ही आणि पी.ए.सिस्टीमच्या निविदा काढताना त्या निकोप आणि स्पर्धात्मक होतील आणि त्याचप्रमाणे झालेल्या कामाची जबाबदारी निश्चित करता येईल आणि प्रत्यक्ष कुंभमेळयाच्यावेळी यंत्रणा उत्कृष्ट चालेल याची दक्षता घ्यावी. | NMSCDCL<br>नाशिक महानगरपालिका<br>नप त्र्यंबकेश्वर<br>नाशिक शहर पोलीस<br>नाशिक ग्रामीण पोलीस |
| **क** | **वाहनतळे** | |
| 1 | वाहनतळाबद्दल सार्वजनिक बांधकाम विभागाने सुधारित प्रस्तावित आराखडयाबद्दल माहीती दिली व असे सांगितले की, नाशिक शहराच्या सर्व बाजूंनी बाह्य वाहनतळांचे क्षेत्रफळ एका एका सेक्टरला (मार्गावर) प्रत्येकी सुमारे 40 ते 70 हेक्टर या प्रमाणे निश्चित करण्यात आले आहे. सर्व बाजूने 40 ते 70 हेक्टर प्रत्येक सेक्टर/ मार्गावर त्याचप्रमाणे त्र्यंबकेश्वर शहरासाठी वेगळे याप्रमाणे असल्याचे सांगितले. त्यानुसार या ठिकाणी आवश्यक तेवढया स्वच्छतागृहे, निवारा शेड व इतर सोई सुविधा | सार्वजनिक बांधकाम विभाग<br>नाशिक शहर पोलीस<br>नाशिक ग्रामीण पोलीस |

| अ.क्र. | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| | पुरविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने नाशिक महानगरपालिकेशी सल्लामसलत करावे तसेच नाशिक शहर आणि नाशिक ग्रामीण पोलीस विभागांनी या सर्व जागा पाहून त्या वाहनतळ म्हणून योग्य आहेत याची खातरजमा करावी. | |
| **ड** | **आराखडे/ कामांचे नियोजन** | |
| 1 | सर्व विभागांनी त्यांचे आराखडे निश्चत करताना पुढील दोन बाबींची काटकोर दक्षता घ्यावी.<br>1. प्रयागराज महाकुंभमध्ये संबंधित विभागांनी केलेल्या नियोजनाचा आधार घेवून त्यापेक्षा अधिक प्रकल्प/ प्रस्ताव/ खर्च करावयाचा असल्यास त्याचे विशेष कारण नमूद करावे.<br>2. सर्व प्रस्तावित कामे/ प्रकल्पांचे/ सुविधांचे जीआयएस वर मॅपिंग करावे. | सर्व विभाग |
| 2 | नाशिक शहर आणि नाशिक ग्रामीण पोलीस विभागाच्या वाहतूक आराखडयानुसार स्मार्ट सिटीने सीसीटीव्हीचे आराखडे निश्चित करावे. त्याचप्रमाणे नाशिक महानगरपालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांचे आराखडे अंतिम करावेत. | नाशिक महानगरपालिका<br>सार्वजनिक बांधकाम विभाग<br>नाशिक शहर पोलीस<br>नाशिक ग्रामीण पोलीस<br>NMSCDCL |
| 3 | नाशिक शहर पोलीसांनी तयार केलेले नियोजन बैठकीत दाखविण्यात आले त्यात वायरलेस सेटचा अंतर्भाव आहे. तथापि प्रयाराज येथे वायरलेस यंत्रणा पोलीस विभाग वगळता इतरही अनेक विभागांनी (उदा. वैद्यकीय, स्वच्छता, अग्नीशमन, आपत्कालीन, इ.) वापरलेल्या आहेत. त्यामुळे इतर विभागांनी कोणत्या प्रकारची वायरलेस यंत्रणा वापरावीत याचा तांत्रिक अभ्यास पोलीस आणि अग्नीशमन विभागांचे अधिकारी यांनी एकत्रितरित्या करावा आणि त्याप्रमाणे शिफारस करावी. जर सदर यंत्रणा ही पोलीस विभागासारखीच ठेवण्याचे निश्चित झाले तर त्याकामी पोलीस विभागाने एकत्रित खरेदी करता येईल काय त्याचा विचार करावा.<br>भोजनाचा खर्च करताना डीए पेक्षा अधिक खर्च करता येईल काय त्याबाबत एकदा तपासून घ्यावे.<br>करावयाच्या दुरुस्त्या या केवळ बॅराक किंवा हॉल सारख्या निवास व्यवस्थेच्या कराव्यात आणि जागा निवासासाठी योग्य होईल एवढया पुरत्या कराव्यात.<br>विविध ठिकाणी (उदा. लॉन्स, मंगल कार्यालय, इ.) निवास व्यवस्था करीत असताना शौचालये/ स्वच्छतागृहे कमी आहेत या कारणामुळे कमी व्यक्तींची सुविधा करु नये कारण उर्वरित आवश्यकेतेनुसार शौचालये/ स्वच्छतागृहे महानगरपालिकेमार्फत तात्पुरत्या स्वरुपात पुरविणे शक्य आहे. त्यामुळे सदर जागेचा अधिकाधिक वापर कसा करता येईल याचा विचार करावा. जेणेकरुन अधिकाधिक कर्मचारी कमीतकमी लॉन्स/ मंगल कार्यालय इ. मध्ये थांबविता येतील. | नाशिक शहर पोलीस<br>नाशिक ग्रामीण पोलीस |

| अ.क्र. | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| | महानगरपालिका व शासनाच्या इतर मालत्तांचा देखील निवास व्यवस्थेसाठी विचार करावा.<br>वाहन खरेदी करण्याकरीता वर नमूद केल्यानुसार प्राधान्याने केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हास्तरीय निधी यानुसार प्राधान्य ठेवावे व अनुज्ञेयतेनुसार खरेदी करावी. कंटेनर पोलीस चौक्या, बॅरिकेड इ. बाबत यापूर्वी विकत घेतलेले कंटेनर, बॅरिकेड व अशा प्रकारचे इतर साहित्य वापरात येईल याची प्राधान्याने दक्षता घेवून त्यानंतर उर्वरित आवश्यकतेनुसार खर्च करावे. | |
| **इ** | **साधूग्राम/ भूसंपादन** | |
| 1 | नाशिकच्या साधुग्राम भूसंपादन प्रकरणात शासनाकडे पाठपुरावा करावा. त्याचप्रमाणे आरक्षणाखाली असलेली जमीन वगळता इतरही जमिनींवर साधुग्राम किंवा तत्सम सुविधा उभारण्यासाठी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर या दोन्ही ठिकाणी अतिरिक्त जागा निश्चित करुन त्याचे नियोजन करावे. | नाशिक महानगरपालिका<br>नप त्र्यंबकेश्वर |

याशिवाय इतरही सूचना देण्यात आल्या, आणि त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देवून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त झाल्याचे जाहीर करण्यात आले.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 24-03-2025 18:06:14

(डॉ. प्रवीण गेडाम)
अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती,
तथा विभागीय आयुक्त, नाशिक.